# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०–२५६०११८९
२५६०११९०
टेलीग्राफ : 'युनिपुना'
टेलेक्स : १४५ ७७१९ युनीप इन
फॅक्स नं. : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ernet.in

गणेशखिंड,पुणे ४११००७

आरक्षण कक्ष
संदर्भ क्र. आरक्षण/२२/१८
दिनांक – ६/१/२०११

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय – मागासवर्ग प्रवर्गाच्या उमेदवारांना सेवेत संस्थामध्ये पदोन्नतीपूर्वी जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.
संदर्भ – शासन पत्र क्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.४७/मावक–५, दि. २६/३/२०१०

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मागासवर्ग प्रवर्गाच्या उमेदवारांना शासकीय व निमशासकीय सेवेत नियुक्ती/पदोन्नती देण्यापूर्वी जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना शासनाने उपरोक्त परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत. सोबत शासन परिपत्रक जोडत आहे. तरी महाविद्यालये/संस्थां स्तरावर उपरोक्त शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

6/1/2011
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबत – वरीलप्रमाणे

अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांमध्ये पदोन्नती पूर्वी जाती प्रमाणपत्रांची पडताळणी करून वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन परिपत्रक :-सीबीसी-१०/२०१०/प्र.क्र.४७ /मावक-५,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनाक :- २६ मार्च, २०१०

वाचा :- १) शासन निर्णय , विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग क्रमांक :- सीबीसी-१२/२००२/२५२/प्र.क्र.१/इमाव-५, दिनांक २५ जानेवारी, २०००

२) शासन परिपत्रक ,सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक :-सीबीसी-१०/२००४/प्र.क्र. ५७० /मावक-५, दिनांक ५ मार्च , २००५.

३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :-बीसीसी-२००९/प्र.क्र.२५१/०९/१६ ब , दि. ०५नोव्हेंबर, २००९

प्रस्तावना :- अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत , निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थामध्ये पदोन्नतीपूर्वी जाती प्रमाणपत्रांची पडताळणी करून वैधता सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक - २ दिनांक ०५/०३/२००५ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. तथापि सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-३ दिनांक ०५ नोव्हेंबर, २००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ७ मध्ये " **मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज या पुढे नियुक्ती अथवा पदोन्नत्ती देण्यात येऊ नये.** " असे आदेश पारित करण्यात आले आहेत. त्यामुळे दोन्ही आदेशामधील तरतूदींचे पालन करण्याबाबत क्षेत्रीय अधिका-यांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. याबाबत सुस्पष्ट असे आदेश सर्व संबंधितांना देण्याची आवश्यकता असल्याने सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भ क्रमांक-२ दिनांक ०५/०३/२००५ च्या आदेशामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :- शासकीय / निमशासकीय वा तत्सम सेवेत सरळसेवेने प्रवेश तसेच पदोन्नतीबाबतच्या सूचना शासन परिपत्रक दिनांक ०५ मार्च, २००५ अन्वये निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदरचे

[illegible] अशा अधिकारांच्या बाबत रद्द करण्यात येत असून त्याऐवजी खालील प्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत [illegible]

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांची शासकीय वा निमशासकीय कार्यालये, शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था / जिल्हा परिषदा / नगर परिषदा / नगरपालिका / महानगरपालिका / ग्रामपंचायत / मंडळे / महामंडळे / शासनाचे अंगीकृत व्यवसाय / विद्यापीठे /शासकीय शिक्षण संस्था आश्रमशाळासह /सहकारी संस्था / बँका / सहकारी बँका / सहाय्यक अनुदान मिळणा-या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या-ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये यांना राज्याच्या तिजोरीतून निधी / अनुदान / सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्वप्रकारच्या संस्था / मंडळे येथे निवड मंडळामार्फत / निवड समितीमार्फत / विविध निवड मंडळे / लोकसेवा आयोगामार्फत राखीव असलेल्या पदावर शिफारस झालेल्या / निवड केलेल्या उमेदवारांचे जाती प्रमाणपत्र पडताळणी करण्याबाबत आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करण्यासाठी नियुक्ती प्राधिका-यांनी उमेदवारांना तात्काळ कळवावे व संबंधीत उमेदवारांनी त्यांच्या जाती दाव्या प्रित्यर्थ आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता एक महिन्याच्या आत संबंधीत प्राधिका-याकडे करावी. कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर संबंधित कार्यालयाने तात्काळ संबंधीत जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे कागदपत्रे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत.

२. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर ३ महिन्याच्या आत जाती दाव्याचा समितीचा निर्णय संबंधीत आस्थापनेस कळवावा. संबंधीत उमेदवाराच्या जातीचा दावा वैध असल्याबाबतचा समितीचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर संबंधित आस्थापनेने उमेदवारास नियुक्ती द्यावी.

३. ज्या मागासवर्गीय कर्मचारी व अधिका-यांची जाती प्रमाणपत्राची पडताळणी अद्यापि झालेली नाही व सद्यस्थितीत पदोन्नतीच्या क्षेत्रात (Zone of Consideration ) येत असतील असे अधिकारी व कर्मचा-यांचे पदोन्नतीच्या प्रक्रियेपुर्वी ६ महिने अगोदर सर्व प्रशासकीय विभागाने जाती प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठवून जातीचे वैध प्रमाणपत्रे प्राप्त करून घ्यावीत व नंतरच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

४. सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असुन त्याचा सांकेतांक संकेतांक २०१००३२६१८४१३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सतीश गवई )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
मा. राज्यपाल यांचे सचिव,

D:2010 bcw 5/gr2010.hvp